## // प्रकरण - ४ थे //

# // संशोधनाची रूपरेषा //

४.१ प्रास्ताविक

४.२ संशोधनाची कार्यपध्दती.

४.३ संशोधनात वापरलेली साधने

४.४ संशोधन विषयासाठी नमुना निवड.

४.५ संशोधनाच्या माहितीचा उद्गम.

४.६ अभ्यासकाला आलेले अनुभव.

## // प्रकरण - ४ थे //

# // संशोधनाची रूपरेषा //

### ४.१ ** प्रास्ताविक :-

मागील प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन विषयाशी असलेल्या संबंधीत व त्या विषयात आजपर्यंत करण्यात आलेल्या संशोधनाचा मागोवा घेतला आहे. व त्या संशोधनाचा अभ्यास केलेला आहे.

या प्रकरणामध्ये "उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास या विषयाच्या अभ्यासाची पार्श्वभूमी समजावून घेवून तो पूर्ण करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे.

या प्रकरणामध्ये विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांच्या संदर्भात असलेल्या अडचणींचा शोध घेण्यासाठी संशोधनाची जी कार्यपध्दती उपयोगात आणलेली आहे. त्याचा येथे सविस्तर खुलासा केलेला आहे.

यामध्ये या संशोधनासाठी वापरण्यात आलेली कार्यपध्दती माहिती संकलनासाठी उपयोगात आणलेली संशोधनाची साधने, प्रश्नावली, मुलाखती इत्यादी व त्याचे स्वरुप, नमुना निवड आणि संशोधनाच्या माहितीचा उगम याची माहिती या प्रकरणामध्ये दिलेली आहे.

म्हणजेच या संशोधनासाठी अभ्यास करण्यासाठी अभ्यासकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे. कारण की सर्वेक्षण पध्दतीमुळे वर्तमान सद्य स्थितीचा अभ्यास करणे सोपे जाते. म्हणजेच त्याचा उपयोग हा संबंधीत विषयास अभ्यासकाला मार्गदर्शन करण्यासाठी व समस्या सोडविण्यासाठी होतो. अभ्यासकाला त्याच्या समस्येची उकल करण्यासाठी आवश्यक परिस्थिती समजून घेण्यासाठी याचा उपयोग होतो.

४.२. ** संशोधनाची कार्यपध्दती :-

अभ्यासकाने निवडलेला संशोधन विषय हा ज्वलंत व विचारशील असा आहे. तसेच तो वर्तमान परिस्थितीशी निगडीत, सद्य स्थितीवर व प्रचलित असलेल्या प्रशिक्षण विद्यालयाच्या संदर्भात असल्याने माहिती गोळा करण्यासाठी प्रामुख्याने सर्वेक्षण पध्दती" या वापर केला आहे.

सध्या शैक्षणिक संशोधनामध्ये सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. सध्या शैक्षणिक संशोधनात सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग विशेष प्रमाणात केला जात आहे. या प्रकारच्या संशोधन पध्दतीत अभ्यासवस्तुच्या सद्य:स्थितीचे वर्णन करते आणि सद्य:स्थिती स्पष्ट करून, वर्तमान संबंध, प्रचलित परिपाठ, दिसून येणाऱ्या निष्ठा दृष्टीकोण आणि अभिवृत्ती, सुरु असलेल्या प्रक्रिया, जाणवणारे परिणाम विकसित होत असलेले विचार प्रवाह यांचे यथायोग्य व स्पष्ट चित्र मिळविता येते.

थोडक्यात वर्तमानस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या

संशोधन पद्धतीला "सर्वेक्षण पद्धती" असे म्हणतात.

सर्वेक्षण म्हणजे प्रचलित तथ्यांचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण आणि मूल्यांकन करणे होय.

सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र कळते, कोणकोणत्या बाबी, कोणत्या स्थितीत उपलब्ध आहेत. म्हणजे आवश्यक अशी तुलनात्मक माहिती मिळते. विशिष्ट क्षेत्रातील समस्या निराकरणाकरिता कोणती स्थिती अपेक्षित आहे हे कळते व या अपेक्षित स्थिती प्राप्त करून समस्येची उकल करण्याकरीता कोणत्या साधनांची व प्रयत्नांची आवश्यकता आहे हे त्यामुळे कळते.
[१]

वरील उद्देशानेच अभ्यासकाने या "सर्वेक्षण पद्धतीचा" उपयोग करून माहिती गोळा केलेली आहे. त्यामध्ये अभ्यासकाने अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणार्थींनी यांच्यासाठी, प्रश्नावली तयार केलेली आहे. तसेच अध्यापक विद्यालयातील प्राध्यापक यांच्यासाठीही प्रश्नावली तयार केलेली आहे. तसेच अध्यापक विद्यालयांच्या प्राचार्यासाठीही प्रश्नावली तयार केलेली आहे. या संशोधन प्रकल्पाच्या संदर्भात केलेले प्रयत्न, वापरलेल्या व उपयोगात आणलेले उपक्रम, पद्धती, त्याच प्रमाणे या कार्याच्या संदर्भात येणाऱ्या अडी-अडचणी, व त्यावरील उपाययोजना या संशोधनाच्या उद्दिष्टांवर भर देण्यात आला, आणि वरील मुद्द्यांना अनुसरूनच त्याचा अभ्यास केला आहे व या अभ्यासावरूनच माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखत अनुसूची तयार केली. ती अनुसूची परिशिष्टामध्ये जोडलेली आहे. या संशोधनात वापरलेल्या साधनांचा सविस्तर खुलासा पुढे दिला आहे.

## ४.३ ** संशोधनात वापरलेली साधने **

"उस्मानाबाद जिल्ह्यातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास" या विषयाचा अभ्यास करण्यासाठी पुढील प्रमाणे साधने वापरलेली आहेत. संशोधन विषयासाठी निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उपयोगात आणावयाची साधने ठरविली जातात. त्याच प्रमाणे संशोधनाची सामुग्री गोळा करण्याकरीता निरनिराळी साधने वापरली जातात. विशिष्ट साधनांच्या सहाय्याने विशिष्ट प्रकारचीच माहिती गोळा होते. या संदर्भात "जॉन डब्ल्यू बेस्ट", यांच्या मते :-

The survey method gathers data from a re-latively large number of cases at a particular time. It is not concerned with Characteristics of individuals as individuals. It is concerned with the generalized statistics that result when date are abstracted from a number of individuals cases. It is essentially Crossectional"[4]

अभ्यासकाने सदर संशोधन विषयाची माहिती गोळा करण्यासाठी चार साधनांचा वापर केला आहे.

१] प्रश्नावली.

२] मुलाखती

३] चर्चा.

४] अध्यापक विद्यालयांना भेटी. केलेले निरीक्षण.

०१] ** प्रश्नावली :-

अभ्यासकाने प्रस्तुत संशोधन विषयामध्ये विनाअनुदानित अध्यापक विद्यालयाच्या प्रशासकीय समस्यांच्या संदर्भात समस्यांचा शोध घेण्यासाठी व संशोधनास लागणारी माहिती गोळा करण्यासाठी प्रामुख्याने प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला आहे.

अभ्यासकाने या संशोधन विषयाची उद्दिष्टे समोर ठेवून विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील ८० प्रशिक्षणार्थी, प्रशिक्षणार्थींनी यांच्यासाठी प्रश्नावली तयार केली. त्याच्या ८० प्रति झेरॉक्स तयार केल्या आणि संशोधन कार्याच्या अभ्यासासाठी प्रश्नावलीचे वाटप पुढील प्रमाणे केले.

[१] अभ्यासाठी वाटप केलेल्या प्रश्नावली :-

| | | |
|---|---|---|
| अ] अध्यापक विद्यालय गिरवली ता.भूम जि.उस्मानाबाद | : | २० |
| ब] तेरणा अध्यापक विद्यालय, उस्मानाबाद | : | २० |
| क] श्रमजिवी अध्यापकविद्यालय, उमरगा जि.उस्मानाबाद | : | २० |
| ड] अध्यापक विद्यालय, परंडा जि. उस्मानाबाद | : | २० |
| एकूण ... | | ८० |

त्याचप्रमाणे अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांसाठी ही चार प्रतित प्रश्नावली संशोधन कार्याच्या अभ्यासासाठी तयार केल्या आहेत.

[२] प्रश्नावलीचे संशोधन समस्येच्या अभ्यासाठी वाटप पुढील प्रमाणे केले आहे.

| | | |
|---|---|---|
| अ] अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य | : | ०४ |
| ब] अध्यापक विद्यालयाचे अध्यापक | : | २४ |
| एकूण.. | | २८ |

अशा एकूण १०८ प्रश्नावल्या विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्राचार्य, अध्यापक, प्रशिक्षणार्थी यांना वाटप करून त्या प्रश्नावल्या पैकी ९७ भरून मिळाल्या त्यामध्ये अध्यापक विद्यालयातील प्राचार्यांना चार प्रश्नावल्या देवून ३ भरून मिळाल्या. तसेच अध्यापक विद्यालयातील चोवीस [२४] अध्यापकांना प्रश्नावल्या वाटप करून १७ भरून मिळाल्या. तसेच अध्यापक विद्यालयातील ऐंशी [८०] प्रशिक्षणार्थींना प्रश्नावल्या वाटप करून ७७ भरून मिळाल्या.

अशा एकुण भरून आलेल्या ९७ प्रश्नावल्यांचा [प्राचार्य, अध्यापक आणि प्रशिक्षणार्थी] अभ्यास करून अभ्यासकाने शोध प्रबंध पूर्ण केला आहे. त्या प्रश्नावलींचे स्वरूप पुढे दिलेले आहे.

** <u>प्रश्नावलीचे स्वरूप</u> :-

संशोधन विषयाच्या उद्दिष्टानुसार भरून आलेल्या प्रश्नावलीचे, प्रतिसादक प्रशिक्षणार्थींची माहिती व संशोधनाची उद्दिष्टे यावरून आठ भाग पाडण्यात आलेले आहेत. ही प्रश्नावली परिशिष्ट क्रमांक २.१ मध्ये दिलेली आहे.

[१] विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थींसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीच्या प्रत्येक विभागातील थोडक्यात माहिती दिलेली आहे.

* <u>विभाग</u> १ :-

या विभागात प्रशिक्षणार्थींचे नांव, शैक्षणिक पात्रता अध्यापक विद्यालयाचे नाव, गांव, निवडलेल्या अध्यापन पद्धती व या विषयींची माहिती मिळविण्यासाठी प्रश्न आहेत. या विभागात एकुण पाच प्रश्नांची संख्या आहे.

* विभाग २ :-

या विभागात अध्यापक विद्यालयातील व्याख्यान कक्षाची, बैठकीची, प्रकाश योजनेची माहिती मिळविण्यासाठी प्रश्न आहेत. या विभागात चार प्रश्न आहेत.

* विभाग ३ :-

या विभागात विज्ञान प्रयोगशाळे विषयी माहिती मिळविण्यासाठी प्रश्न दिले आहेत. त्यांची संख्या तीन आहे.

* विभाग ४ :-

या विभागात ग्रंथालयातील माहिती जाणून घेण्यासाठी प्रश्न आहेत. त्यांची एकुण संख्या पाच आहे.

* विभाग ५ :-

या विभागात अध्यापक विद्यालयाचे क्रिडांगण व कार्यानुभव यांची माहिती मिळविण्यासाठी प्रश्न आहेत. त्यांची एकूण संख्या चार आहे.

* विभाग ६ :-

या विभागात सरावपाठा विषयीच्या प्रशिक्षणार्थींना येणाऱ्या अडचणीची माहिती मिळविण्यासाठी प्रश्न आहेत त्यांची एकूण संख्या पाच आहे.

** विभाग ७ :-

या विभागात मानसशास्त्र प्रयोगासंबंधीची माहिती

मिळविण्यासाठी प्रश्न आहेत. त्यांची एकूण संख्या ७ आहे.

* विभाग ८ :-

या विभागात सुक्ष्मअध्यापनाची माहिती मिळविण्यासाठी प्रश्न आहेत. त्यांची एकूण संख्या सात आहे.

अशा प्रकारे या प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नावलीचे एकूण आठ विभाग आहेत. व या आठ विभागात एकूण ३५ प्रश्न आहेत. त्यापैकी होय / कांही प्रमाणात / नाही स्वरुपाचे एकूण वीस प्रश्न आहेत. त्याच प्रमाणे प्रतिसादकांना जादा माहिती लिहीण्यासाठी प्रश्नावलीमध्ये जागा दिली आहे.

अभ्यासकाने विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थींसाठी एकूण ७७ प्रश्नावल्या प्रतिसादकांना दिल्या या प्रश्नावल्या प्रतिसादकांना प्रत्यक्ष भेटून दिल्या.

प्रश्नावली दिलेल्या प्रतिसादकांची यादी परिशिष्ट क्रमांक २.१ मध्ये दिलेली आहे.

[२] प्राचार्यासाठी तयार केलेल्या प्रश्नावलीचे प्रतिसादकांची माहिती व संशोधनाची उद्दिष्टे यावरुन भाग पाडण्यात आले आहेत. अशी प्रश्नावली परिशिष्ट क्रमांक २.२. मध्ये दिलेली आहे.

या प्रश्नावलीमध्ये प्रथम प्रतिसादकाचे नांव, अध्यापक विद्यालयाचे नांव, शैक्षणिक पात्रता, अनुभव मुलांच्या प्रवेशाविषयी प्राध्यापकांच्या नेमणूकी विषयी, वेतना विषयी, इमारती विषयी, सरावपाठाविषयी, वेगवेगळ्या उपक्रमां विषयी, ग्रंथालयाविषयी, अध्यापन पध्दती, संस्थाचालकांच्या सहकार्या विषयी माहिती विचारली आहे. या प्रश्नावलीतील एकूण प्रश्नांची संख्या तेवीस आहे.

अशाप्रकारे अध्यापक विद्यालयातील प्राचार्यासाठी प्रश्नावली तयार केली आहे. या पैकी होय/नाही या स्वरूपाचे ६ प्रश्न आहेत. तसेच होय/काही प्रमाणात/नाही लिहण्यासाठी प्रश्नांपुढे जागा दिलेली आहे.

अशा प्रकारे अभ्यासकाने जिल्ह्यातील चार अध्यापक विद्यालयातील प्राचार्यासाठी प्रश्नावल्याचे वाटप प्रत्यक्ष भेटून आणि पोष्टाने पाठविलेल्या आहेत. प्रश्नावली दिलेल्या प्रतिसादक प्राचार्यांची यादी परिशिष्ट क्रमांक २.२ मध्ये दिलेली आहे.

[३] प्राध्यापकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीचे प्रतिसादकांची माहिती व संशोधनाची उद्दिष्टे यानुसार प्रश्न दिलेले आहेत. अशी प्रश्नावली प्रश्नावली परिशिष्ट क्रमांक २.३ मध्ये दिलेली आहे.

या प्रश्नावलीमध्ये प्रथमतः अध्यापक विद्यालयाचे, नाव, प्रतिसादकाचे नांव, शैक्षणिक पात्रता, अध्ययन अनुभव, नेमणूक वेतन, अध्यापन करणारा विषय, इतरांचे सहकार्य कक्षागृहा विषयी, सुक्ष्म अध्यापन, सरावपाठ, ग्रंथालय, पाठ होत असताना येणाऱ्या अडचणी शिबीर या विषयी प्रश्न विचारले आहेत. यामध्ये एकूण २८ प्रश्न विचारण्यात आले आहेत.

अशाप्रकारे प्राध्यापकांना दिलेल्या प्रश्नावलीमध्ये एकूण २८ प्रश्न आहेत. त्यापैकी होय / नाही स्वरूपाचे सहा प्रश्न आहेत. होय/काही प्रमाणात / नाही स्वरूपाचे पाच प्रश्न आहेत. तसेच जादा माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावलीत प्रश्नांपुढे जागा दिला आहे.

अशाप्रकारे अभ्यासकाने २४ प्राध्यापकांना भेटून आणि पोष्टाने प्रश्नावलीचे वाटप केलेले आहे.

प्रश्नावली दिलेल्या प्राध्यापक प्रतिसादकांची यादी परिशिष्ट क्रमांक २.३ मध्ये दिलेली आहे.

** मुलाखतीत केलेली चर्चा :-

प्रतिसादकांविषयी प्रत्यक्ष भेटून माहिती मिळविण्याचे अतिशय प्रभावी साधन म्हणजे चर्चा होय. अभ्यासकाने चर्चेसाठी प्रश्न व त्यांचे स्वरूप म्हणजेच संरचित आराखडा निश्चित करून तो उपयोगात आणला आहे.

अभ्यासकाने प्रस्तुत संशोधनामध्ये चर्चा पध्दती या साधनांचा वापर करून मनमोकळ्या रीतिने २० प्रशिक्षणार्थी, १ प्राचार्य, चार प्राध्यापक, यांच्याशी चर्चा केली त्यासाठी चर्चेच्यासाठी लागणाऱ्या प्रश्नांचा आराखडा तयार करून त्याचे स्वरूप चर्चा अनुसूची मध्ये दिलेले आहे. ही चर्चा अनुसूची परिशिष्ट क्रमांक ३ मध्ये दिलेली आहे.

प्रतिसादक २० प्रशिक्षणार्थी चार प्राध्यापक, एक प्राचार्य यांच्याशी चर्चा करून चर्चेद्वारे मिळणाऱ्या माहितीच्या नोंदी केल्या आहेत. त्यामध्ये वैयक्तिक माहिती, शैक्षणिक पात्रता, असणाऱ्या सोयीसुविधा, येणाऱ्या समस्या, उपाय याविषयी माहिती मिळविण्यासाठी त्याच प्रमाणे वेगवेगळे तंत्रज्ञान विकसीत करण्याविषयी आपण विकसीत करु शकू इत्यादी बाबतचे प्रश्न अभ्यासकाने चर्चिले आहेत. तो आराखडा परिशिष्ट क्रमांक ३ मध्ये दिलेला आहे.

[३] भेटी :-

अभ्यासकाने उस्मानाबाद जिल्ह्यातील चार विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांना व अध्यापक विद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी

यांना प्रत्यक्ष भेटी देवून निरीक्षण केले. प्रत्यक्ष भेटीत खालील मुददयांना धरून, पहाणी करून माहिती मिळविली.

प्रशिक्षणार्थींच्या प्रशिक्षण घेण्याचा प्रतिसाद अजमावण्याची, गोडी आहे किंवा नाही हे पाहण्याचा प्रत्यक्ष रीतीने प्रयत्न केला.

अध्यापक विद्यालयातील वर्गामध्ये जाऊन त्यांची [प्रशिक्षणार्थींची] वैयक्तिक माहिती विचारली, शिक्षक होणे का पसंद केले? शिक्षकी पेशा विद्यार्थीची अभिरुची वाढावी म्हणून कोणकोणते उपक्रम होता? पाठविद्यायी शाळांचे सहकार्य मिळते का? योग्य मार्गदर्शन मिळते का? आपणास अडचणी येत असतील तर त्या सोडविण्यासाठी आपण काय करता? ग्रंथालय, कार्यालय, खेळाचे मैदान यांची पहाणी केली. अध्यापक विद्यालया संबंधीच्या अडचणींची माहिती गोळा केली. तसेच अध्यापक विद्यालयातील प्राध्यापक/वर्गशिक्षक प्राचार्य यांना भेटून त्यांच्याकडून पण प्रशासना विषयीची माहिती मिळविली. तसेच अध्यापन पध्दती, सूक्ष्मपाठ संबंधी, सरावपाठ संबंधी चर्चा करून माहिती मिळविली.

अशा प्रकारे अभ्यासकाने ४ अध्यापक विद्यालयांना भेटी दिल्या आहेत. या प्रतिसादक अध्यापक विद्यालयाची यादी परिशिष्ट क्रमांक ४ मध्ये दिलेली आहे.

## ४.४ ** संशोधन विषयासाठी नमुना - निवड **

प्रस्तुत शोधनिबंधात अभ्यासकाने, उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालय हे उस्मानाबाद जिल्हा हे कार्यक्षेत्र

केलेले आहे. म्हणून याच कार्यक्षेत्रातील प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक, प्राचार्य हे प्रतिसादक म्हणून निवडलेले आहेत. त्यांची निवड साध्या यादृच्छिक नमुना पध्दतीने केलेली आहे. त्यांचा तपशिल पुढे दिलेला आहे.

[१] उस्मानाबाद जिल्हयातील ८० प्रशिक्षणार्थी की, जे विना अनुदानित अध्यापक विद्यालयामध्ये प्रशिक्षण घेत आहेत.[८०]

या प्रतिसादक प्रशिक्षणार्थींची यादी परिशिष्ट क्रमांक २.[१] मध्ये दिलेली आहे.

[२] त्याच प्रमाणे उस्मानाबाद जिल्हयातील ४ प्राचार्यांना प्रश्नावल्या दिलेल्या आहेत, त्यांचा तपशिल पुढे दिले आहे.

विनाअनुदानित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य = ०४

या प्रतिसादक प्राचार्यांची यादी परिशिष्ट क्रमांक २[२] मध्ये दिलेली आहे.

[३] उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील २४ प्राध्यापकांना प्रश्नावल्या दिलेल्या आहेत. त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| १] तेरणा अध्यापक विद्यालय, उस्मानाबाद | : | ०६ |
| २] श्रमजिवी अध्यापक विद्यालय उमरगा जि. उस्मानाबाद | : | ०६ |
| ३] अध्यापक विद्यालय परंडा जि.उस्मानाबाद | : | ०६ |
| ४] अध्यापक विद्यालय, गिरवली जि. उस्मानाबाद | : | ०६ |
| | | २४ |

या प्रतिसादक प्राध्यापकांची यादि परिशिष्ट क्रमांक २[२] मध्ये दिलेली आहे.

अशा प्रकारे उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील ८० प्रशिक्षणार्थी ४ प्राचार्य, २४ प्राध्यापक यांची प्रतिसादक म्हणून निवड केली आहे. सदर नमुना उस्मानाबाद जिल्ह्यातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थी, प्राचार्य आणि प्राध्यापक यांचे प्रतिनिधीत्व करणाराच आहे. या प्रतिसादक प्रशिक्षणार्थी, प्राचार्य, प्राध्यापक यांची यादी परिशिष्ट क्रमांक २ [१, २, ३] मध्ये दिलेली आहे.

## ४.५ **o- संशोधन विषयातील माहितीचा उद्गम **

[०१] प्रस्तुत संशोधन विषयात ८० प्रशिक्षणार्थींना दिलेल्या प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली माहिती हा सर्वात मोठा व महत्वाचा उद्गम आहे.

[०२] त्याचप्रमाणे प्राचार्य, प्राध्यापक यांना दिलेल्या प्रश्नावलीच्या आधारे मिळालेली माहिती सुध्दा प्रतिसाद हा पण सदर संशोधनाच्या माहितीचा उद्गम आहे.

[०३] त्याचप्रमाणे अभ्यासकाने प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी अनुभवि प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल यांच्या प्रश्नावली द्वारे चर्चे द्वारे मिळालेली माहिती हा पण या संशोधन विषयाच्या माहितीचा उद्गमच आहे.

[०४] तसेच प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी अभ्यासकाने प्रशिक्षणार्थ्यांशी केलेली चर्चा आणि चर्चेतून मिळालेली माहिती हाही

[५] अभ्यासकाने उस्मानाबाद जिल्हयातील विनाअनुदानित अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व निरीक्षण केले. भेटी आणि निरीक्षणाद्वारे बरीचशी माहिती मिळाली. ही माहिती सुध्दा एक प्रकारचा उद्गमच आहे.

४.६ ** अभ्यासकाला आलेले अनुभव **

प्रस्तुत संशोधनाचे काम पूर्ण करताना अभ्यासकाला निरनिराळे अनुभव आले ते खालील प्रमाणे आहेत :-

[०१] दोन अध्यापक विद्यालयातील प्रश्नावल्या "प्रशासकीय समस्यांचा चिकित्सक अभ्यास" या विषयामुळे भरून देण्यास टाळाटाळ झाली. त्यासाठी विनंती करून प्रश्नावल्या भरून घेतल्या.

[०२] प्रशिक्षणार्थींसाठी असलेली प्रश्नावली कांही प्रतिसादकांनी व्यवस्थीत भरून दिल्या नाहीत.

[०३] विनाअनुदानित अध्यापक विद्यालय असल्यामुळे कांही प्रतिसादकांनी सोयी सुविधा नसुनही, सोयी आहेत अशी माहिती पुरवली.

[०४] कांही ठिकाणच्या प्रश्नावल्या वेळेवर भरून दिल्या गेल्या नाहीत त्यामुळे आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला.

[०५] एक दोन वाक्यात माहिती असणाऱ्या प्रश्नांची उत्तरे. तसेच शिफारशी मागितलेल्या प्रश्नांची उत्तरे बहुतांशी लिहली गेली नाहीत.

# // संदर्भ सूची //

[०१] ** डॉ. भिंताडे वि.रा.

शैक्षणिक संशोधन पध्दती
नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०
प्रथमावृत्ती - नोव्हेंबर १९८९.
पेज - ७० ते ९०.

[०२] ** डॉ. बापट भा.गो.

शैक्षणिक संशोधन
नूतन प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे-३०
तृतीयावृत्ती - २६ जानेवारी १९८८
पेज - ८७ ते ११०.

[०३] ** प्रा. मुळे रा.श्री.
** प्रा. उमाठे वि.तु.

शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे
महाराष्ट्र विद्यापिठ, ग्रंथ निर्मिती मंडळ,
महात्मा गांधी मार्ग, नागपूर -१
दुसरी आवृत्ती - १९८७
पेज - ११० ते ११५

(04) JOHN, W. BEST :-

"Research in Education"

prentice Hall of India


Private Limited,

NEW DHLHI.

1977, Page No. 156

P.P. 403.

------x------


उस्मानाबाद जिल्हा.
प्रमुख रस्ते व लोहमार्ग
0 २५ ५०
कि.मी.
परंडा.
पाथुड
कुंथलगिरि
भूम.
येरमाळा.
काटी
सावरगाव
तामलवाडी
तुळजापूर
उस्मानाबाद
येडशी.
कळंब
ढोकी.
तेर.
खंडाळा.
नळदुर्ग.
आलूर.
दाळींब.
उमरगा.
सूची.
राष्ट्रीय महामार्ग.
प्रमुख रस्ते.
लोहमार्ग.
जिल्हा मुख्य ठिकाण.
तालुका मुख्य ठिकाण.
गांव.